Annexure-6

**मे. विराज अल्कोहोल्स आणि अलाइड इंडस्ट्रिज लिमिटेड, गट नं. ५११, मुक्काम पोस्ट- कापरी, तालुका- शिराळा, जिल्हा- सांगली, महाराष्ट्र यांचा धान्यकणांवर आधारित आसवणी क्षमता विस्तार ३०.० किलो लिटर/प्रतिदिन पासून ५८.० किलो लिटर/प्रतिदिन पर्यंतच्या प्रकल्पाबाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत.**

---

मे. विराज अल्कोहोल्स आणि अलाइड इंडस्ट्रिज लिमिटेड, गट नं. ५११, मुक्काम पोस्ट- कापरी, तालुका- शिराळा, जिल्हा- सांगली, महाराष्ट्र यांचा धान्यकणांवर आधारित आसवणी क्षमता विस्तार ३०.० किलो लिटर/प्रतिदिन पासून ५८.० किलो लिटर/प्रतिदिन पर्यंतच्या प्रकल्पाबाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार दिनांक, ३० सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडील कार्यालयीन आदेश क्रं. ई-८०, पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०९१४-एफटीएस-०१०२ दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली.

१) डॉ. अभिजीत चौधरी, (भाप्रसे) - अध्यक्ष
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली

२) श्री. रविंद्र आंधळे, - सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

३) नवनाथ अवताडे, - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

श्री नवनाथ एस. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. अभिजित चौधरी, जिल्हादंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री रविंद्र आंधळे, प्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सदरची सुनावणी भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४-०९-२०२० च्या Office Memorandum नुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली. आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. विराज अल्कोहोल्स आणि अलाइड इंडस्ट्रिज लिमिटेड, गट नं. ५११, मुक्काम पोस्ट- कापरी, तालुका- शिराळा, जिल्हा- सांगली, महाराष्ट्र यांचा धान्यकणांवर आधारित आसवणी क्षमता विस्तार ३०.० किलो लिटर/प्रतिदिन पासून ५८.० किलो लिटर/प्रतिदिन पर्यंतच्या प्रकल्पाबाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला होता त्याअनुषंगाने सदरील प्रकल्पास अधिसूचनेनुसार "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील राज्य पर्यावरण तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २८-०३-२०१८ रोजी सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०५-१०-२०१८ रोजी प्रदान केली.

सदरील पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सांगली यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २९ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती.

त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सांगली, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सांगली , तहसीलदार, तहसील कार्यालय-शिराळा, जिल्हा-सांगली, मुख्याधिकारी, शिराळा नगरपंचायत, शिराळा, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय- कापरी, जांबुळवाडी, इंगरुळ, खेड, बिळुर, भाटशिरगांव, तालुका- शिराळा, जिल्हा-सांगली, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले व पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचे सादरीकरण करण्याबाबत मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने तांत्रिक सल्लागार यांना विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात ४३.९९ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आलेली असून विस्तारिकरणासाठी १२.०६ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी एकूण भांडवली खर्च ५६० लाख तर पर्यावरण सयंत्रणा देखभालीसाठी रुपये ९२ लाख राखीव ठेवलेले आहेत.

सादरीकरण झाल्यानंतर आयोजक यांनी उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी तोंडी वा लेखी स्वरुपात सादर करण्याचे उपस्थितांना आवाहन करुन प्रश्न कर्त्यांने आपले नांव व गावाचे नांव सांगुन प्रश्न उपस्थित करण्याची विनंती केली.

खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टिकरण दिले.

१) श्री स्वप्नील उत्तम पाटील, राहणार-बिऊर, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली.

प्रश्न- प्रकल्प विस्तारिकरण करण्यासाठी आपणास किती पाणी लागेल?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात एकूण ९६०.० किलोलिटर पाणी लागेल. त्यातील २६% पाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे सादरीकरणात याबाबत संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यामुळे फक्त ५५३.० किलोलिटर एवढेच ताजे पाणी विस्तारिकरण प्रकल्पासाठी आवश्यक आहे.

२) श्री संजयराव जगन्नाथ देसाई, राहणार-भाटशिरगांव, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली.

प्रश्न- प्रकल्पाची क्षमता वाढविल्यानंतर प्रकल्प वार्षिक किती दिवस कार्यान्वित राहणार आहे?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की धान्यकणांवर आधारित हा प्रकल्प शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असतो. कुठलेही प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रकल्पाबाहेर सोडण्यात येत नाही. सांडपाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर जाणार नाही. मळीवर आधारित प्रकल्प कंपोस्टींग करत असल्यास तो फक्त २७० दिवस चालविण्यात येतो. मात्र हा प्रकल्प ३३० दिवस चालविण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे झेडएलडी म्हणजे Zero Liquid Discharge (ZLD) ,शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे.

३) श्री शशिकांत रंगराव पाटील, राहणार-खेड, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली.

प्रश्न- प्रकल्प विस्तारिकरणामुळे ध्वनि प्रदूषणात वाढ होईल काय?

उत्तर- प्रकल्पात मोठा आवाज निर्माण होणारी कोणतीही क्रिया (Activity) नाही किंवा मोठा आवाज उत्पन्न होणारी कुठलीही यंत्रे जशी खाणकाम उद्योगात जेसीबी यंत्रे असतात, तशी या प्रकल्पात वापरण्यात येणार नाही. प्रकल्पात पंप वापरताना, डिस्टिलेशनच्या वेळी प्रकल्पातील ध्वनी पातळी ही निर्देशित पातळीत म्हणजे ७५ डेसिबलपेक्षा जास्त असणार नाही. त्यामुळे आवाजाचा कोणताही त्रास होणार नाही.

४) श्री राजेन्द्र दगडू कदम, राहणार-शिराळा गाव, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगली

प्रश्न- विस्तारिकरण प्रकल्पात नवीन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे काय?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्पात २०.० टीपीएच क्षमतेचा बॉयलर कार्यान्वित असून त्याचा सद्यस्थितीत फक्त ५०% वापर करण्यात येत आहे. त्यामुळे विस्तारिकरणानंतर कार्यान्वित बॉयलर पूर्ण क्षमतेने वापरण्यात येणार असल्याने अतिरिक्त इंधन जाळण्याचा प्रश्न उद्भवत नाही. नवीन बॉयलरची आवश्यकता नाही.

५) **<u>श्री संदीप जगन्नाथ साळवी, राहणार-बत्तीस शिराळा, तालुका - शिराळा, जिल्हा-सांगलीः-</u>**

प्रश्न- प्रकल्प विस्तारिकरणानंतर प्रकल्पातील विविध उत्पादन क्षमतेत कशा प्रमाणात वाढ होईल?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ह्या धान्यकणांवर आधारित प्रकल्पात प्रथम रेक्टीफाईड स्पिरिट (आर.एस.) तयार होते, त्यानंतर इथेनॉल व त्यानंतर इ.एन.ए यांचे उत्पादन होते. त्याचप्रमाणे प्रकल्पात जोड उत्पादन म्हणून सीओटू ($CO_2$) उत्पन्न येईल. त्याचे बॉटलींग करुन शीतपेय प्रकल्पासाठी त्याचा वापर करण्यात येईल. तो हवेत सोडण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे उत्पादनात तयार होणारे डी.डी.जी.एस व डी.डब्ल्यु.जी.एस. हे पशूखाद्य म्हणून उपयोगात येणार आहे.

६) **<u>श्री शहाजी महादेव देवकड,राहणार-जांभळेवाडी, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-</u>**

प्रश्न- हरितपट्टा विकसनासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहे?

उत्तर- प्रकल्प र्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार एकूण प्रकल्प क्षेत्राच्या ३३% हरितपट्टा विकसित करण्यात आलेला आहे. २,५०० वृक्ष प्रत्येक हेक्टर असा मानक आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी ३,००० झाडे लावलेली आहेत. भविष्यात हरित पट्टा विकसित करण्यात येणार आहे. अतिरिक्त ३,००० झाडे लावण्यात येतील व हरितपट्ट्यात झाडांची विरळता कमी करुन त्यांची दाट प्रमाणात (Density) वाढ करण्यात येईल.

७) **<u>श्री महेश फत्तेसिंग माळी, राहणार-खेड गाव, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-</u>**

प्रश्न- प्रकल्प विस्तारिकरणाचा सभोवतालच्या गावांना काय फायदा होईल?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की स्थानिकांना व देशाला सदरहू विस्तारिकरणाचा फायदा व्हावा हाच प्रकल्प प्रवर्तकांचा उद्देश आहे. या विस्तारिकरणाचा स्थानिक पातळीवर आणि देशपातळीवरही फायदा होणार आहे. स्थानिक पातळीवर फायदा म्हणजे स्थानिक शेतक-यांना डी.ब्लु.जी.एस पशूखाद्य स्वरुपात मिळणार आहे. त्यामुळे दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळू शकतो.

आता देशपातळीवरील फायदा म्हणजे इथेनॉलचा वापर. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी अल्कोहोलला महत्वाचे स्थान आहे ते इथेनॉलपासून तयार करण्यात येते. केंद्र सरकारने अल्कोहोल पेट्रोल ब्लेंडिंगसाठी वापरण्याचे धोरण जाहिर केलेले आहे. त्यामुळे परकीय चलनात मोठ्या प्रमाणात बचत होईल.

८) **<u>श्री रामचंद्र हिंदुराव गायकवाड, राहणार-बिऊर गाव, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-</u>**

प्रश्न- प्रकल्प विस्तारकरणासाठी किती प्रमाणात खर्च होणार आहे?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पासाठी ४३.९९ कोटी एवढा आतापर्यंत खर्च करण्यात आलेला असून विस्तारिकरणासाठी अतिरिक्त १२.०६ कोटी गुंतवणूक करण्यात येईल.

९) श्री अर्जून रामचंद्र पाटील, राहणार-कापरी गाव, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-

प्रश्न- प्रकल्प विस्तारिकरणामुळे जो घन कचरा उत्पन्न होईल, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

उत्तर- प्रकल्प उत्पादनात घन कचरा म्हणजे बॉयलरमधून जी राख उत्पन्न होईल, ती स्थानिक शेतक-यांना खत म्हणून उपलब्ध करण्यात येईल. त्याचप्रमाणे ती स्थानिक वीटभट्टी धारकांना वीटा तयार करण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल. त्याचप्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर तयार होणारा ईटीपी स्लज हा सुध्दा शेतक-यांना खत म्हणून देण्यात येईल.

१०) श्री सहदेव नामदेव पाटील, भाटशिरगांव, तालुका-शिराळा, जिल्हा-सांगलीः-

प्रश्न- सदरहू प्रकल्पाच्या विस्तारिकरणामुळे किती प्रमाणात सांडपाणी निर्माण होईल?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सांडपाण्यात विविध घटक आहेत, फक्त प्रकल्पातील प्रकियेतीलच सांडपाणी नाही, तर बॉयलर व कुलींगमधीलही पाणी. सद्या कार्यरत प्रकल्पात कुलींग व बॉयलरचे २४.० घनमीटर एवढे सांडपाणी निर्माण होते. कन्डेन्सेटमधील पाण्याचा पूर्णपणे पुनर्वापर प्रक्रियाशिवाय करण्यात येतो. तर विस्तारिकरणानंतर एकंदरीत उत्पन्न होणारे ४७.० घनमीटर पाणी औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेत प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्यात येईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की आजपर्यंत सदरहू प्रकल्पाबाबत एकही आक्षेप प्राप्त झालेला नाही. त्याचप्रमाणे पर्यावरणविषयक दस्तवेज ज्या अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते, तेथेही कोणतेही आक्षेप नोंदविण्यात आलेले नाही. उपस्थितांकडून कोणताही प्रश्नांबाबतचा प्रतिसाद नसल्याने आयोजकांनी अध्यक्ष आणि सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना त्यांच्या काही सूचना असल्यास त्या नोंदविण्याची विनंती केली.

११) श्री रविंद्र आंधळे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती.

प्रश्न- व्हिओसी मॉनिटरिंग करण्यात आलेले आहे काय?

उत्तर- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की व्हिओसी मॉनिटरिंग करण्यात आलेले आहे. त्याची पातळी ही Below Detectable Limit आढळली. $CO_2$ चे करण्यात आले. तेही Below Detectable Limit आढळून आले.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण अत्यंत साध्या व सरळ भाषेत चांगल्या प्रकारे समजून सांगितले आणि त्यात विस्तारिकरण करताना आवश्यक असणारे वेगवेगळे पैलू म्हणजे उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल, त्यावरची प्रक्रिया व संभाव्य प्रदूषणावर नियंत्रण करण्यासाठी प्रस्तावित विविध उपाययोजना याची माहिति चांगल्याप्रकारे दिली. त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या विस्तारिकरणाच्या अनुषंगाने

उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्न, आक्षेप यांचे आपण योग्य प्रकारे निराकरण केलेले आहे. याबद्दल अध्यक्षांनी पर्यावरण सल्लागार यांचे अभिनंदन केले.

अध्यक्षांनी मत मांडले की स्थानिक आर्थिक प्रगतीसाठी अश्या प्रकल्पाची गरज आहे. त्यांनी सांगितले की सदरहू बैठकीत उपस्थित करण्यात आलेले आक्षेप, सूचना यांची नोंद घेण्यात येऊन शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहिर केले.

शेवटी श्री. नवनाथ सं. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी तथा पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक यांनी समितीचे मा. अध्यक्ष, सदस्य तसेच सर्व उपस्थित नागरीक, कारखान्यांचे पदाधिकारी, तात्रिक सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी केलेल्या सहकार्याबददल आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने आजची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

उपरोक्त सुनावणीची कार्यवाही सकाळी ११-३० वाजता सुरु होवून दुपारी ०१-१५ वाजता समाप्त झाली.

(नवनाथ अवताडे)
आयोजक तथा
उप प्रादेशिक अधिकारी,म. प्र. नि. मंडळ,
सांगली

(रविंद्र आंधळे)
सदस्य तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ
कोल्हापूर

(डॉ. अभिजीत चौधरी,भाप्रसे)
अध्यक्ष,
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली,